नुरजहॉं अब्दुल हमीद डबीर
वि.
इब्राहीम इस्माईल जळगांवकर व इतर

## नियमीत दिवाणी दावा क्र.०९/२०२२ मधील निशाणी क्र. ११ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. १ ते ४ आणि ६ व ७ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

०२. प्रतिवादी अर्जात असे कथन करतात की, त्यांना दाव्याचे समन्स दिनांक १०/०३/२०२२ रोजी प्राप्त झालेले आहे. परंतु त्यांना विविध शासकीय कार्यालयातुन दाव्यासंदर्भातील कागदपत्रे काढण्यासाठी बराचसा वेळ गेला. त्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. सबब प्रतिवादींनी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला ४७ दिवसांचा विलंब माफ करुन मागितलेला आहे.

०३. त्याउलट वादीने प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविलेली आहे. वादीचे असे कथन आहे की, अर्जामध्ये दिलेले कारण हे योग्य व संयुक्तिक नाही. त्यामुळे त्याने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. उभयपक्षकारांतर्फे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा ठरावाकरिता आणि निरंतर मनाई करिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ आणि ६ व ७ यांना दिनांक १०/०३/२०२२ रोजी समन्सची बजावणी झाल्यानंतर ते न्यायालयात हजर झाले परंतु, त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही. सबब त्यांनी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मागितलेला आहे.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादीला दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने

जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादीला जवळ-जवळ ४७ दिवसांचा विलंब झालेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी त्यांना दाव्यासंदर्भात आवश्यक असलेली कागदपत्रे मिळवण्यासाठी वेळ लागल्यामुळे मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही, असे कारण नमुद केले आहे. परंतु ती कागदपत्रे कोणती होती, ती प्रतिवादींना कधी प्राप्त झाली याचा तपशिल अर्जामध्ये दिलेला नाही. त्यामुळे अर्जातील कारण हे संयुक्तिक कारण असल्याचे दिसत नाही. परंतु, प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता प्रतिवादी क्र. १ ते ४ आणि ६ व ७ यांना त्यांची कैफियत दाखल करुन देण्याची परवानगी देणे न्यायोचित आहे. प्रतिवादींनी संयुक्तीक कारण दिलेले नसल्यामुळे अर्जाचा खर्च त्यांच्यावर ठेवणे उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:-

**:–आदेश–:**

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज (निशाणी क्र.११) रक्कम रु.५००/- च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम वादीला देण्यात यावी. |
| **२.** | खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ४ आणि ६ व ७ यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2022.12.12 17:58:54 +0530

दिनांकः १२/१२/२०२२
खालापूर.

**(पी.एम.माने)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खालापूर.